सं. फौ. ख. क्र. १५७/२०१५ निशाणी क्र. २०

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. २ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – रसिका रमेश सालोडकर

वय – ६७ वर्षे व्यवसाय – घरकाम

पत्ता – आकुर्डी, पुणे

**सरकार तर्फे सरकारी वकिल श्री. के.एस. ताकवाले यांचा सरतपास**

१. मी आरोपीला ओळखते. घटनेच्या वेळी आम्ही अकोला येथे राहत होतो. सन २०१४ मध्ये उन्हाळयाच्या दिवसात शेगाव ते अकोला जात असतांना दुपारी १२ वाजता बस क्र. एम.एच. ०७–७६४० या वाहनाने आम्ही प्रवास करीत असतांना सदर बस ड्रायव्हर जोरात गाडी चालवत होता त्यामुळे पिवळा नाला येथे अपघात झाला. बस क्र. एच.एच.०७–७६४० या बसने एका कारला धडक मारली. त्यामुळे माझा उजवा हात लुळा पडला, हाड तुटले. घटना घडल्यानंतर दुस–या बसने अकोला येथील डॉ. महाशब्दे यांचेकडे उपचारा करीता गेलो. माझ्या उजव्या हाताचे ऑपरेशन करुन प्लेट बसविली. घटनेच्या वेळी माझ्या सोबत माझे पती होते. माझ्या पतीला थोडा मार लागला होता. पोलिसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे माझे बयान नोंदविले होते. आरोपी आज न्यायालयामध्ये हजर आहे.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपी तर्फे वकिल श्री. एन.एन. जामोदे**

२. हे म्हणणे खरे नाही की, कोर्टात आल्यानंतर सरकारी वकीलांनी मला समजावुन सांगितले. कोर्ट हॉलमध्ये मी बसले होते. माझे बयान नोंदविते वेळी माझा उजवा हात लुळा पडला, हाड तुटले ही बाब मी पोलिसांना कथन केली होती. माझे बयान नोंदविते वेळी डॉ.महाशब्दे यांचे नाव पोलिसांना सांगितले होते. परंतु सदर बाबी माझ्या बयानामध्ये पोलिसांनी का नमुद केल्या नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. पोलिसांनी माझे बयान घटनेनंतर किती दिवसांनी नोंदविले हे मला निश्चीतपणे सांगता येणार नाही. माझे शिक्षण बी.ए.प्रथम वर्ष पर्यत झाले आहे.

३.		हे म्हणणे खरे नाही की, मला आठ ते दहा वर्षापुर्वीची घटना आठवत नाही. मला जेवढे आठवत आहे तेवढे मी सांगितले आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या वेळी शेगाव–बाळापुर –अकोला या रस्त्याची परीस्थीती खराब होती आणि रस्त्यावर खड्डे पडले होते. हे म्हणणे खरे आहे की, पिवळा नाला या ठिकाणावर रस्त्याला वळण असुन तो रस्ता चढावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, पिवळा नाला या ठिकाणी बाळापुर कडुन शेगाव कडे जात असतांना सर्व वाहनांना विरुध्द दिशेने जावुन पुढे वळण घ्यावा लागतो. हे म्हणणे खरे आहे की, शेगाव कडुन बाळापुर कडे येतांना बाळापुर कडुन जाणा–या वाहनांना त्याच्या समोरुन येणार वाहन पुढे जाई पर्यत बाजुला थांबावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या वेळी सुध्दा पिवळा नाला येथे वर नमुद केलेल्या बसच्या विरुध्द दिशेन एक कार येत होती.

४.		माझे बयान नोंदविते वेळी बसचा ड्रायव्हर जोरात गाडी चालवत होता हे हा शब्द मी पोलिसांना सांगितला होता कि नव्हता हे मला आठवत नाही. सदर प्रश्नाला सरकारी वकीलांनी असा आक्षेप नोंदविला कि, सदर साक्षीदाराच्या बयानामध्ये भरधाव वेगाने असा शब्द वापरलेला आहे. **सदर बाब अभिलेखावर न्यायालय घेत असतांना आरोपी चे विधीज्ञ श्री. एन.एन. जामोदे यांनी अशा प्रकारे हरकर अभिलेखावर घेता येणार नाही असे सांगुन प्रखर विरोध केला.**

५.		हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासामध्ये आरोपी विरुध्द कथन केलेल्या सर्व बाबी खोटया सांगितल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगते अशी कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पडल्यामुळे माझा हात तुटला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

दिनांक : ०९/०२/२०२४.
ठिकाणः बाळापूर

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
समक्ष

स्वा/–
( विष्णु द. गिते )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२),बाळापूर.

| I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original order. | | |
|---|---|---|
| Name of the Court | :- | Jt. Civil Judge, J.D. & J.M.F.C., Balapur |
| Name of the Stenographer | :- | Ajay N. Hande |
| Date of Decision | :- | 09/02/2024 |
| Order signed by P.O on | :- | 09/02/2024 |
| Order uploaded on | :- | 09/02/2024 |